Lokmat epaper Published on March 14 2011 , Page 10

# गरिब-श्रीमंतातील दरी कमी होणे आवश्यक - यशवंत सिन्हा




महाराष्ट्र इंडस्ट्रीयल अँड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट असोसिएशनच्या सहाव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित महाराष्ट्र इकॉनॉमिक समिटचे आयोजन मुंबईत करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर (डावीकडून) असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे, माजी केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा, महाराष्ट्राचे राज्यपाल के. शंकरनारायणन, ओरिसाचे राज्यपाल मुरलीधर भंडारी, त्रिपुराचे राज्यपाल डी.वाय.पाटील आणि मान्यवर.

**मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी)** - जागतिकीकरणानंतर देशाच्या विकासदरात सातत्यपूर्ण वाढ होत आहे, ही जरी समाधानाची बाब असली तरी, एकिकडे विकासदर वाढत असताना दुसऱ्याबाजूने गरिब आणि श्रीमंत यांच्यातील दरीही कमी होणे गरजेचे आहे, असे मत माजी केंद्रीय अर्थमंत्री आणि खासदार यशवंत सिन्हा यांनी येथे व्यक्त केले. महाराष्ट्र इंडस्ट्रीयल अँड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट असोसिएशनच्या सहाव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित महाराष्ट्र इकॉनॉमिक समिट परिषदेत यशवंत सिन्हा बोलत होते.

विकासदर सातत्याने वाढत असला तरी, समाजाच्या दोन वर्गातील दरी कमी होण्याचे उद्दीष्ट या प्रक्रियेत साधले गेले पाहिजे. तसेच विकासाची व्याप्ती ही केवळ शहरांपुरती मर्यादीत न राहता ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करू शकेल, असा विकास साधला गेला पाहिजे यावर सिन्हा यांनी आपल्या भाषणात जोर दिला. पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे देशाच्या विकासाला निश्चित चालना मिळेल. पण याचबरोबरीने विशेषतः ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, शिक्षण, वैद्यकीय सेवा अशा सामाजिक पायाभूत सुविधांची निर्मितीही तितकीच गरजेची असल्याचे ते म्हणाले. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे प्रमुख डॉ. सी.रंगराजन यांनी पायाभूत सुविधा तसेच देशाचा विकास दर यासंदर्भात भाष्य केले. जागतिक मंदीतूनही देश झपाट्याने सावरला असून, चीनपाठोपाठ भारताचाच दबदबा सर्वत्र असल्याचे ते म्हणाले. परिषदेचे आयोजक आणि महाराष्ट्र इंडस्ट्रीयल अँड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट असोसिएशनचे सर्वेसर्वा चंद्रकांत साळुंखे यांनी राज्यातील आणि देशातील लघुउद्योगाची स्थिती, परिणामकारता तसेच लघुउद्योग वाढीसाठी आवश्यक उपायोजनांवर मते मांडली. परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्राचे राज्यपाल के. शंकरनारायणन, त्रिपुराचे डी.वाय. पाटील तसेच ओरिसाचे मुरलीधर भंडारी असे तीन राज्यपाल उपस्थित होते. ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, उद्योगपती आनंद महिन्द्रा, सेबीचे माजी अध्यक्ष जी.एन.वाजपेयी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उद्योगपतींचा यशवंतराव चव्हाण मेमोरिअल अॅवॉर्ड फॉर एक्सलन्स या पुरस्काराने गौरव करण्यात आला.

## लोकमतचा गौरव

उद्योग क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेल्या उद्योगपतींचा गौरव करण्यात आला. मीडिया श्रेणीमध्ये लोकमत मीडिया लि.चा यशवंतराव चव्हाण मेमोरिअल अॅवॉर्ड देऊन गौरव करण्यात आला. लोकमत मीडिया लि.चे चेअरमन आणि मुख्यसंपादक खा.विजय दर्डा यांना हा पुरस्कार घोषित झाला आहे. त्यांच्यावतीने लोकमतचे समुह संपादक दिनकर रायकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

PRESSMART

**Axis Bank Jobs** 100s of New Openings Submit Resume to Apply Now MonsterIndia.com
**Marathi Katha** Find Marathi Katha on Facebook. Sign up now! www.Facebook.com
**Looking for My Marathi?** Find My Marathi on Facebook. Sign up now! www.Facebook.com
Ads by Google